**प्रेस नोट दिनांक :— २७/०९/२०२३**

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १)श्री.मनोज रत्नाकर बुंदीले वय—४२वर्षे, रा.वार्ड नं.४ माहूली जहागीर ता.जि.अमरावती (सरपंच यांचे पती)<br>२)सौ.प्रिती मनोज बुदीले,वय— ३४ वर्षे, सरपंच, ग्राम पंचायत माहूली जहागीर ता.जि.अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | २७/०९/२०२३ चे १३/५७ वा.ते १५/५० वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ५,०००/—रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | तडजोडीअंती ४,०००/— रूपये. |
| ६ | घटनास्थळ | कौशल्य कॉम्प्युटर इंन्स्टिटयुट, माउली जहागीर ता.जि.अमरावती |

यातील तक्रारदार यांनी दि.२६/०९/२०२३ रोजी तक्रार दिली की,तक्रारदार यांनी ग्रामपंचायत माहुली जहांगीर,ता.जि.अमरावती येथील १५ वित्त आयोग (पं.स.स्तर) अंतर्गत १.स्पेशियल रिपेअर टू वॉटर सप्लाय स्किम व २. पी.व्ही.सी.पाईप टाकुन चेंबर करून सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे असे दोन कामे ग्रामपंचायात कडील वर्क ऑर्डर प्रमाणे सदरचे काम पुर्ण केले आहे.ग्रा.पं.माहूली जाहगिंर येथील पुर्ण केलेले कामाचे मोबदल्यामध्ये ग्रा.पं.माहुली जहांगिर कडून तक्रारदार यांना आरटीजीएसव्दारे पुर्ण पैसे मिळाले. खात्यात पैसे जमा झाले नंतर माहुली जहांगीर,ता.जि.अमरावती,येथील सरपंच सौ.प्रिती मनोज बुंदीले यांचे पती श्री.मनोज बुदीले यांनी तकारदार यांना वांरवार फोन करून सरपंच सौ.प्रिती बुंदीले यांचे करिता ५,०००/—रू.दयावे लागतील नाहीतर यापुढे तुम्हाला ग्रा.पं.माहूली जाहंगीर येथे काम मिळणार नाही व तुम्हाला नविन टेंडर करीता लागणा—या अनुभव प्रमाणपत्रावर सरपच सौ.प्रिती बुदीले यांची सही व शिक्का देणेकरीता सरपंच यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांनी एकुन ५,०००/—रू.लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.२६/०९/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान सरपंच यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांनी तक्रारदार यांना त्यांनी ग्रा.पं.माहूली जाहंगीर येथे पुर्ण केलेले कामाचे अनुभव प्रमाणपत्रावर सरपच सौ.प्रिती बुदीले यांची सही व शिक्का देणेकरीता तडजोडी अंती ४,०००/—रु.लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

वरून आज दि.२७/०९/२०२३ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान ग्रा.पं.माहूली जाहगीर सरपंच सौ.प्रिती मनोज बुदीले यांनी ही तक्रारदार यांचेकडे पतीचे लाच मागणीस होकार देवून तक्रारदार यांना त्यांचे पती श्री.मनोज बुंदीले, यांनी मागणी केलेप्रमाणे लाच रक्कम देण्यास सांगीतले. त्यावेळी सरपंच पती श्री.मनोज बुंदीले यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम ४०००/—रू.पंचासमक्ष स्विकारल्याने सरपंच सौ.प्रिती बुदीले यांचे पती श्री.मनोज बुंदीले यांना ताब्यात घेण्यात आले असुन, सरपंच सौ.प्रिती मनोज बुंदीले व त्यांचे पती मनोज रत्नाकर बुदीले यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.शिवलाल भगत, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे **मार्गदर्शनाखाली श्री.मिलींदकुमार बहाकर,** पोलीस उप अधिक्षक, **पो.नि.सतिश उमरे,** मपोनि.विजया **पंधरे,मपोहवा/माधुरी साबळे,पोहेकॉ/प्रमोद** रायपुरे,पोशि/शैलेश कडु,पोशि/उपेद्र थोरात,पो.कॉ.वैभव **जायले,पोशि/निलेश महिंगे, चालक पोहवा/गोवर्धन नाईक व चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.**

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.संपर्क: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.

ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,२६६४९०२
टोलफ्रिनंबर— १०६४

पोलीस उप अधिक्षक अॅन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते

(मिलींदकुमार बहाकार)
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.